## <u>नि.दि.दा.नंबर ४३/२०२५ मधील निशाणी २९ चे अर्जावरील आदेश.</u>

### ( सुखदेव कोळेकर व. वि. तुकाराम कोळेकर व. )

प्रस्तुतचे अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दिलेला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे:–**

२. प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तूत अर्जाद्वारे वादी दाव्याच्या कलम नं. १ यात नमुद केलेली व इतर मिळकती या वादी प्रतिवादींच्या वाडवडिलार्जित मिळकती असून त्यानुसार संबंधीतांची वंशावळही दाव्यात नमुद केली आहे. मुळ दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादींचे तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे दिले. सदर म्हणणेत वादींनी दावेकामी दिलेली वंशावळ चुकीची असल्याची तक्रार केली आहे. त्याबाबत वादींकडे चौकशी करीता दाव्यात नमुद केले वंशावळीत तसेच इतर तदनुशंगिक दुरूस्ती करणे क्रमप्राप्त झाले असून त्याकरीता सदरचा अर्ज केला आहे.

३. वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती – वादींनी दर्शवलेली वंशावळीत मयत सुभानाचा मुलगा म्हणून श्रीपती दर्शवला आहे त्याऐवजी मयत सुभानाचा मुलगा म्हणून "बिरू" असे नमुद करणेची परवानगी व त्याचे नावापुढे मयत असे लिहीणेची परवानगी मागीतली आहेत. तसेच प्रतिवादींनी त्यांचे कैफियतीत घेतले तक्रारीनुसार "मयत सुभाना यास कमळाबाई, बाजी व भिवा अशी जी अपत्ये दर्शविली आहेत, ते सर्वसाधारणपणे बरोबर असले तरी ती मयत असलेने

व त्यांना कोणी वारस नसल्याने त्यांना वारस म्हणून दर्शविणेचा प्रश्न उद्भवत नाही." तसेच "प्रतिवादींनी त्यांचे म्हणणेत सुभानाचा मुलगा म्हणून जो "भाऊ" दर्शविला आहे, ते बरोबर असले तरी भाऊ व त्याचे इतर बंधु यांचेत दाव्यात नमुद केलेप्रमाणे झाले वाटपानुसार भाऊ यास ज्या मिळकती आल्या, त्या मिळकतीची त्याने त्याचे कुटूंबासाठी विक्री केलेने नमुद भाऊचा सदर मिळकतीत काही संबंध नाही. त्यामुळे नमुद भाऊचा अगर त्यांचे वारसांचा सदर मिळकतीशी संबंध नसलेने त्यास दाव्यात समाविष्ठ करणेचे कारण नाही." अशी दुरुस्ती दावा कलम २ चे शेवटी करणेची परवानगी मागितली आहे. सदर दुरुस्ती ही वादींच्या गैरसमजूतीने झालेली असून सदर दुरुस्तीने दाव्यात कोणताही बदल होत नाही. सबब वादींनी दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी मागितली आहे व सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादीचे अर्जातील पुढील कथनाप्रमाणे सदरप्रमाणे दुरूस्ती केल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही उलट प्रस्तूत प्रकरणी न्यायनिर्णय होण्यास मदत होणार असल्याचे कथन त्यांनी केले आहे.

**५.** प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे नि.क्र. ३२ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारील आहेत. प्रतिवादी यांचे म्हणणे की, वादी यांनी त्यांचे अर्ज पॅरा कलम २ मध्ये ज्या पध्दतीचा दुरूस्तीबाबतचा मजकुर नमुद केलेला आहे त्याचे सविस्तरपणे अवलोकन केले असता नेमके वादींना दाव्यात काय दुरूस्ती करावयाची आहे आणि त्यांची नेमकी मागणी काय आहे याचा कोणतयाही प्रकारचा बोध होत नाही. केवळ वेळ मारु नेण्यासाठी व वादीचा दावा लांबणीवर पडून त्याचा त्राय या प्रतिवादींना व्हावा या दुष्ट हेतूने सदरची दुरूस्ती मागणी करु

पाहत आहेत. प्रतिवादीचे थोडक्यात असे कथन आहे की, त्यांनी जबाबदावा दाखल केल्यानंतर पाश्चात्य बुध्दीने प्रस्तूतचा अर्ज सादर केलेला आहे. प्रस्तूत अर्जाद्वारे होत असलेल्या दुरुस्तीमूळे दाव्याचे स्वरुप बदलत आहे. तसेच कायद्याप्रमाणे कमिशन नेमणूकीसाठी दिलेल्या अर्जामध्ये दुरुस्ती करता येत नसल्याने प्रस्तूतचा अर्ज चालण्यास पात्र नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

**६.** प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

**७.** वादी विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पहाणी केली असता असे दिसुन येते की प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादी करु इच्छीत असलेल्या दुरुस्तीमूळे वंशावळ पटण्यासाठी आवश्यक आहे. वादी प्रस्तूत अर्जान्वये दाव्यामध्ये दुरूस्ती करु इच्छीत आहे. सबब दावा दावा निकाली काढते वेळी वादी व प्रतिवादींची वंशावळ अभिलेखावर असणे आवश्यक आहे. वादीने दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार केले आहेत किंवा कसे ही बाब अथवा

नमुद बिरुचा वारस श्रीपती आहे किंवा कसे याबाबत पुराव्या अंती स्पष्ट होणार आहेत. जरी सदरच्या बाबी चुकीच्या असल्या तरी त्याबाबत प्रतिवादीला पुरावा देण्याची संधी आहे. त्यामुळे अर्ज मंजूर केल्यास त्याचा कोणताही विपरीत परिणाम प्रतिवादींवर होणार नाही, परंतू सदर दुरुस्तीमूळे प्रकरणात झालेल्या विलंबाबाबत वादीने प्रतिवादीस रक्कम रुपये ५००/– अदा करणे योग्य होईल, असे प्रामाणिक मत व्यक्त करुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीस अर्जात नमुद प्रमाणे दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी याने झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना रक्कम रु. ५००/– (रक्कम रुपये पाचशे मात्र) खर्च अदा करावेत.

४. वादींनी त्या अनुशंगाने दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन, दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.01.07 17:01:48 +0530

**(एम. ए. कुलकर्णी )**

**दिनांक: ०७.०१.२०२६**

**सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,**

**कवठेमहांकाळ.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 07.01.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 07.01.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 08.01.2026 |